Jyoti/Marathi Letter

<u>मुंबई विद्यापीठ</u>

क. युजी/२७१/२०१७-१८

<u>परिपत्रक :-</u>

विषय :- <u>जुन्या अभ्यासक्रमानुसार परिक्षा देण्याकरता शेवटची अतिरिक्त संधी देण्याबाबत.</u>

संदर्भ :- १) Circular No. UG/109 of 2015, dated 16th October, 2015,
२) परिपत्रक क.युजी/१४२/२०१६, दि. २ मार्च, २०१६,
३) परिपत्रक क. .युजी/३७/२०१६, दि. १ ऑगस्ट, २०१६,
४) परिपत्रक क. UG/२५४/२०१६-१७, दि. १० मार्च, २०१७,
५) परिपत्रक क. UG/२५५/२०१६-१७, दि. १४ मार्च, २०१७,

मुंबई विद्यापीठ विभागांचे संचालक/विभागप्रमुख, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना असे सुचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाचे उपरोक्त परिपत्रकांनुसार एप्रिल/मे, २०१७ च्या परिक्षेपर्यत प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष आणि तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची संधी देण्यात आली होती. तद्‌अनुषंगाने सदर बाब पुन:श्च विद्वत परिषदेच्या दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आली, खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**<u>बाब क्र.</u>** ७:१ "असा ठराव करण्यात आला की, अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार परिपत्रक क. UG/२५४/२०१६-१७, दिनांक १० मार्च, २०१७ च्या अनुषंगाने जे विद्यार्थी व बंद झालेल्या जुन्या अभ्यासक्रमातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष किंवा तृतीय वर्षाच्या परीक्षेस बसुन, अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना ते ज्या-ज्या विषयात अनुत्तीर्ण झालेले असतील त्या विषयांच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याची शेवटची संधी देण्यात यावी. यासाठी त्या-त्या विषयांच्या अधिष्ठात्यांनी त्यांच्या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांची तत्कालीन व नव्या अभ्यासक्रमाशी तुलना करुन समतुल्यता ठरवावी व त्यानुसार विद्यार्थ्यांना त्यांनी उत्तीर्ण केलेल्या विषयांची सूट देण्यात यावी. त्यानंतर असाही ठराव करण्यात आला की, उर्वरित अनुत्तीर्ण विषय व सूट न मिळालेल्या विषयांची परीक्षा देण्यासाठी सदर विद्यार्थ्यांना नोव्हेंबर-डिसेंबर, २०१७ व एप्रिल-मे, २०१८ च्या परीक्षेस बसण्याची मुभा देण्यात यावी, तसेच, सदर विद्यार्थ्यांसाठी एप्रिल-मे, २०१८ च्या परीक्षेला बसण्याची शेवटची संधी असेल."

सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(डॉ. दिनेश फ. कांबळे)
प्रभारी कुलसचिव

दि. २७ ऑक्टोबर, २०१७

प्रति,

मुंबई विद्यापीठ विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.

<u>विद्वत परिषद सभा बाब क. ७.१, ३० जुलै, २०१७.</u>